# सोलापूर महानगरपालिका

## मा.स्थायी समिती सदस्य



मा. पल्ली अनिल दत्तात्रय



मा.हुंडेकरी रियाजअहमद इब्राहीम
अध्यक्ष,स्थायी समिती



मा. शेख पीरअहमद अ.करीम



मा. म्हेत्रे अनिता करेप्पा



मा. येमूल मेघनाथ दत्तात्रय



मा.गायकवाड विनोद पुरुषोत्तम



मा. फुलारे श्रीदेवी जॉन



मा. दुधाळ शांताबाई राजाराम



मा.शिकलगर बिस्मिल्ला अल्लाब

# सोलापूर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सदस्य



मा. रोटे सुनिता दादाराव



मा. बत्तुल शशिकला नारायण



मा. रमणशेट्टी चंद्रकांत गुंडप्पा



मा. गडवालकर नरसुबाई नागनाथ



मा. यन्नम श्रीकांचना रमेश



मा.चंदनशिवे आनंद बाबूराव



मा. म्हेत्रे भीमाशंकर बाबूराव

# सोलापूर महानगरपालिका

**मा.स्थायी समितीने अत्यंत परिश्रमपूर्वक**
**तयार केलेले सन २०१६-२०१७ चे**
**अंदाजपत्रक 'अ' व 'क' चे संदर्भात**



## मा.हुंडेकरी रियाजअहमद इब्राहीम

**अध्यक्ष - स्थायी समिती**
**सोलपूर महानगरपालिका,सोलापूर.**

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

मा. महापौर व सभासद बंधू भगिनीनों,

सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक 'अ' व 'क' आपल्यापुढे सादर करीत आहे.

मा.स्थायी समितीच्या अध्यक्षपदी आमची दिनांक ५/३/२०१६ रोजी निवड झाली आहे. या नंतर मा.आयुक्तांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर मा.स्थायी समिती सदस्या समवेत विचारविनिमय करुन मा.स्थायी समितीने फेरबदल करुन, अंदाजपत्रक मा.महानगरपालिकेकडे सादर केलेले आहे. त्याची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या बाबी मर्यादित स्वरुपाच्या असून, **शहर व हद्दवाढ वासियांना योग्य प्रकारे मूलभूत** सेवासुविधा देण्याचे कर्तव्य महानगरपालिकेस पार पाडावे लागते. एकूण खर्चामध्ये दिवसेंदिवस सातत्याने वाढ होत आहे व येणारे उत्पन्न मर्यादित आहे. यामध्ये जरुर त्याबाबीत वाढ करुन आम्ही हे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. सन २०१६-२०१७ चे महसुली व भांडवली अंदाजपत्रक मा.आयुक्त यांनी र.रु.८२८,८५,११,४०१/- च्या रकमेचे सादर केलेले होते. या अंदाजपत्रकातील जमा व खर्च बाजू बाबत मा.स्थायी समितीचे सदस्या समवेत व संबंधित खाते प्रमुख यांचे बरोबर प्राथमिक स्वरुपात चर्चा करुन मा.स्थायी समितीने जमा व खर्चामध्ये फेरफार करुन वाढ केलेली आहे. सदरच्या रकमेतून खर्चाकडे आवश्यक त्या बाबीकरिता जादा तरतूद करुन र.रु. २२२,११,६०,०००/- भांडवली कामासाठी वर्ग केलेली आहे. प्रस्तुत अंदाजपत्रक सादर करताना शहर व हद्दवाढ भागातील नागरीकांना चांगल्या सेवा सुविधा मिळाल्या पाहिजेत या दृष्टीने आमचे प्रयत्न आहे. यासाठी चालु अंदाजपत्रकामध्ये हद्दवाढ भागात जास्तीत जास्त विकासाची कामे करण्यासाठी भरीव तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच शहर व हद्दवाढ भागातील नागरीकांना पुरेसा आणि चांगल्या दाबाने पाणी पुरवठा होण्यासाठी देखील वाढीव पाणीपुरवठा योजना सादर करण्यात आलेली आहे. N.T.P.C. च्यमाध्यमातून निधी उपलब्ध करून घेऊन म.जि.रा.प्रा. कडे योजना कार्यान्वित होईल या करिता प्रयत्न करण्यात आले आहे. सोलापूरांतील लोकांचे राहणीमान, जीवनमान सुधारणा करण्याकरिता व परिसर सर्व सोयी युक्त करण्याकरिता मा.केंद्र शासनाने जाहिर केलेल्या स्मार्ट सिटी

योजनेमध्ये सोलापूर शहराचा समावेश झालेला आहे. शहराचा समार्ट सिटी मध्ये समावेश झालेले सोलापूर शहर स्मार्ट होण्या करिता आवश्यक ती भरीव अशी तरतूद या अंदाजपत्रकामध्ये करण्यत आलेली आहे.

देगांव मलःनित्सारण केंद्रापासून टर्सरी ट्रीटमेंट करून एन.टी.पी.सी. साठी पाणीवापरास देण्याचे नियोजन पी.पी.पी. वर करण्याची असून, सदर नियोजनामुळे एन.टी.पी.सी. साठी घालण्यात आलेले पाईपलाईन मधून ७५ एम.एल.डी.पाणी महानगरपालिकेस उपलब्ध होणार आहे.

N.H.U.M. या शासकीय योजनेतून दवाखाने करिता भरघोस तरतूद करणेत आली असून दवाखाने अद्यावत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे गेल्या सहा महिन्यापासून सोलापूर शहर व हद्दवाढ भागामध्ये नागरीकांना वेळी अवेळी पाणीपुरवठा आणणे अत्यंत कमी प्रमाणात होत असल्याने, नागरीकांना पाण्यापासून होत असलेल्या त्रासाची जाणीव ठेवून आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी चालु अंदाजपत्रकामध्ये आम्ही सर्व मिळकतदारांच्या पाणीपट्टी दरामध्ये सूट देण्याचे ठरविलेले आहे. आणि त्याप्रमाणे मा. सर्व साधारण सभेकडे शिफारस करण्यात आलेली आहे.

सदरचे अंदाजपत्रक तयार करताना मा.पदाधिकारी, मा.स्थायी समिती सदस्य, मा.आयुक्त व संबंधित अधिकारी यांनी आम्हास सहकार्य केलेले आहे. त्याबद्दल त्यांचे आम्ही व्यक्तिशः आभारी आहोत.

मा. स्थायी समितीने तयार करुन शिफारस केलेल्या सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक त्यांच्या सूचना व शिफारसीसह मा. महानगरपालिकेने मंजूर करावे अशी माझी विनंती आहे.

**(रियाजअहमद इब्राहीम हुंडेकरी)**
**अध्यक्ष स्थायी समिती,**
सोलापूर महानगरपालिका
सोलापूर.